Addl. D.G.P. (Trg.)
I.G.P. (Trg.)
... (Trg.)
...S. (Trg.)
Dated. 23 MAR 2016
Inward No.



पोलीस शिपाई भरती
माजी सैनिकांना शारिरीक
पात्रतेत सवलती देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक:पोलीस-१८१६/प्र.क्र.६०/पोल ५ अ
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक:१७ मार्च,२०१६.

२२०|16

वाचा:- (१) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक:आरसीटी-०३०९/प्र.क्र.६९२/पोल ५ अ, दिनांक ९ सप्टेंबर,२०११.
(२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक:प्रशि/पोशि-भरती १५-१६/मा.सै.स./३६/२०१६/६६९,दिनांक १० फेब्रुवारी,२०१६.

प्रस्तावना:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील कलम ४ (१) (अ) मध्ये पुरुष उमेदवारांना ८०० मीटर धावणे ऐवजी ५.०० कि.मी.धावणे ही नवीन तरतूद करण्यात आली होती. त्यानुषंगाने राज्यातील पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांसाठी शारिरीक पात्रतेमध्ये खालीलप्रमाणे सवलत देण्याचा दिनांक ९ सप्टेंबर,२०११ च्या शासन निर्णयान्वये घेतला होता:-

| अ.क्र. | शारीरिक चाचणी परीक्षा | माजी सैनिकांना सवलत |
|---|---|---|
| १ | ५ कि.मी.धावणे | + ७ मिनिटे |

आता दिनांक ७-१-२०१६ च्या आदेशाव्दारे महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम क्रमांक ४ (१) (अ) (अ) तसेच नियम क्रमांक ४ (१) (ब) (अ) मधील शारिरीक चाचणी परिक्षेमध्ये पुरुष उमेदवारांसाठी ५ कि.मी. धावणे ऐवजी १६०० मीटर धावणे व महिला उमेदवारांसाठी ३ कि.मी..धावणे ऐवजी ८०० मीटर धावणे अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शारिरीक पात्रतेत माजी सैनिकांना सवलत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील कलम ४ (१) (अ)

मध्ये माजी सैनिकांना खालीलप्रमाणे सवलत देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे:-

| अ.क्र. | शारीरिक चाचणी परीक्षा | माजी सैनिकांना सवलत |
|---|---|---|
| १ | १६०० मीटर धावणे | + २.३० मिनिटे |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं.द.खेडेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
संचालक, माजी सैनिक विभाग,पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
आयुकत,राज्य गुप्तवार्ता विभाग,मुंबई
कक्ष अधिकारी (का-१६ अ) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती/का-पोल ५ अ